Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

## Single Blind Peer Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

FEBRUARY 2023
(CCCLXXXVIII) 388 (C)

### ENVIRONMENT : ISSUES, CHALLENGES AND SUSTAINABLE DEVELOPMENT



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr.Dhale S.U.
Head Department of Political Sci.
Shivaji College, Hingoli
Tq.Dist.Hingoli (MS)

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

'B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII ) 388- C
ISSN : 2278-9308
Fabruary, 2023


| | | |
|---|---|---|
| 21 | पर्यावरणाचा ऱ्हास आणि शाश्वत विकास डॉ.रेखा बालाजीराव पाटील | 75 |
| 22 | भारतातील कृषी क्षेत्रावरील हवामान बदलाचा परिणाम प्रा. डॉ.शिवाजी पाते | 80 |
| 23 | पर्यावरणीय अर्थशास्त्र आणि शाश्वत विकासतील अडथळे प्रा. देविदास गोकुळ गवळी | 84 |
| 24 | हवामानबदलाचे महाराष्ट्रातील शेतीवरील परिणाम एक अभ्यास प्रा. डॉ. रेणुकादास यशवंत बोनर | 87 |
| 25 | वाढता विकास आणि पर्यावरणाचा असमतोल प्रा. डॉ. रामदास धो.मुकटे | 93 |
| 26 | महाराष्ट्रातील पर्यावरण विषयक चळवळी डॉ. रामभाउ भाकरे | 96 |
| 27 | शाश्वत विकास संकल्पना व स्वरुप प्रा.डॉ. मदन लक्ष्मण शेळके | 100 |
| 28 | पर्यावरण संवर्धन आणि मानवी हक्काचे रक्षण एक समाजशास्त्रीय अध्ययन दलित सुभाषराव कांबळे , प्रा. डॉ. दीपक सु.धारवाडकर | 104 |
| 29 | ग्रामीण साहित्यातील निसर्गदर्शन प्रा डॉ श्रीराम मारोतराव कऱ्हाळे | 110 |
| 30 | पर्यावरण अभ्यास काळाची गरज प्रा. डॉ. व्यंकटेश काळुराम मदनुरे | 114 |
| 31 | खेळाच्या माध्यमातून शाश्वत पर्यावरणाचा प्रचार- प्रसार आणि पर्यावरण संतुलन - एक अभ्यास प्रा. डॉ.गुणाजी पांडुरंग नलगे | 117 |
| 32 | मराठी साहित्यातून आलेले पर्यावरण भान प्रा.डॉ. संगीता मुंढे | 120 |
| 33 | रंगनाथ पठारे यांच्या कथेतील व्यक्तिरेखांचे चित्रण प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील ,केशव विठ्ठल कोकाटे | 124 |
| 34 | नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन व नैसर्गिक संसाधनांवर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे. कु. अश्विनी रोहिदास भोईर, | 128 |




Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

223

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII) 388- C
ISSN : 2278-9308
Fabruary, 2023

# वाढता विकास आणि पर्यावरणाचा असमतोल

प्रा. डॉ. रामदास धो.मुकटे
शिवाजी महाविद्यालय हिंगोली. (महाराष्ट्र)

## प्रस्तावना

मानवाने कितीही प्रगती केली तरी तो निसर्गाशी मुकाबला करू शकत नाही हे निर्विवाद सत्य आहे. अग्नी, वायू, जल यांना आव्हान देऊन विषाची परीक्षा का घ्यावी? विकास व्हावा यात दुमत नाही. परंतु पर्यावरणाचा ऱ्हास करून केवळ राजकीय स्वार्थासाठी, धनदांडग्यांच्या हट्टापायी कायदे, नियम पायदळी तुडवले जात आहेत. महाभयंकर जलप्रलयाने आपले रौद रूप दाखवले आणि शहर 'बुडवून' टाकले जाऊ शकते. अशी परिस्थिती पुन्हा येऊ नये यासाठी पर्यावरणाचा समतोल राखत सर्वांगीण विकास करण्याची आवश्यकता आहे. आपण निसर्गाकडून कितीतरी गोष्टी घेतो; पण आपण त्याला काय परत देतो? म्हणून आता निसर्ग मानवजातीला आपले रंग, रूप दाखवायला लागला आहे. त्सुनामी, अतिवृष्टी यासारखे अनेक प्रकार सामोरे येत आहेत. प्रगती ही माणसाची गरज आहे; पण ती निसर्गाच्या मदतीने करायला हवी. म्हणजे असे की नैसगिर्क वस्तूंना इजा न करता प्रगती झाली पाहिजे. ज्या ज्या वस्तू निसर्गात मुबलक आहेत, त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात झाला पाहिजे. उगाच निसर्गाचे रंग, रूप बदलून आपण जर आपले आयुष्य वाढवीले तर त्यात काय नावीन्य? आपल्याला ज्याने जिवन दिले त्याचाच जीव घ्यायचा का? अवाढव्य लोकसंख्येच्या वास्तव्यासाठी, त्यांच्या राहणीमानाच्या नवीन संकल्पनांना लागणारे साहित्य, प्रत्येक व्यक्तीला भारतीय राज्यघटनेने मिळालेले अधिकारांचे पालन करून, कसे काय उपलब्ध करून द्यायचे? याचे समर्पक उत्तर मात्र कोणाकडेच नाही. वैयक्तिक राहणीमानात आमच्या आवडीनिवडी, आमच्या खाण्यापिण्याच्या सवयी, इतर संकल्पना, यामध्ये आम्ही पर्यावरणाचा जरादेखील विचार करणार नाही.पर्यावरणाचा प्रश्न जिथल्या तिथेच राहतो.

## संशोधनाची उद्दिष्टे

1. विकास आणि पर्यावरण संबंध अभ्यास करणे.
2. मानवी प्रगतीमुळे पर्यावरणाची हानी होते काय? याचा अभ्यास करणे
3. पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी उपाय सुचवणे.

## संशोधन पद्धती

प्ररतुत लघु संशोधन कार्यासाठी संशोधनाचे द्वितीय पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये संशोधन विषय संबंधित पूर्वी असलेली माहिती ज्यांच्या माध्यमातून उपलब्ध केली जाते असे संदर्भ ग्रंथ,मासिके वृत्तपत्रे,इलेक्ट्रॉनिक्स मीडिया इत्यादी साधने.

## विषय विश्लेषण

मानवी कृतींमुळे पर्यावरणाची घटलेली गुणवत्ता वाढविणे व पर्यावरणाची स्थिती सुधारणे या ध्येयांसाठी जाणीवपूर्वक केलेली कृती. पर्यावरणाच्या असंतोलामुळे सर्व सजीवांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पर्यावरणतज्ज्ञ, अभ्यासक, शासक, प्रशासक, सामाजिक तसेच राजकीय कार्यकर्ते या समस्यांवर विचारविनिमय करीत आहेत. त्यातूनच पर्यावरण व्यवस्थापन ही संकल्पना पुढे आली आहे. पर्यावरण व्यवस्थापन ही विकास व नियोजनाच्या संदर्भातील संकल्पना आहे. यात समाजाचा सर्वांगीण विकास करणे तसेच नैसर्गिक

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII) 388- C
ISSN : 2278-9308
Fabruary, 2023

संसाधनांचा समतोल वापर करून सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणे, ही उद्दिष्टे अभिप्रेत आहेत. त्याचबरोबर मानवाच्या अविचारी कृतींवर नियंत्रण, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पर्यावरणीय समस्यांच्या निवारणासाठी निर्धारित केलेली तत्त्वे यांचा पर्यावरण व्यवस्थापनात समावेश होतो. मानवाच्या सामाजिक व आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाची गुणवत्ता राखण्याचा प्रयत्न यातून केला जातो.पर्यावरण व्यवस्थापन ही मानव आणि निसर्ग यांच्यात समन्वय साधणारी प्रक्रिया आहे. त्याद्वारे पर्यावरणाचे संतुलन बिघडू न देता व प्रदूषणविरहित पर्यावरण राखून मानवाचे हित साधण्याचा प्रयत्न केला जातो. पर्यावरणाच्या आपत्तीवर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया ही पर्यावरण व्यवस्थापनाचे एक अंग असून यात नियोजन, विश्लेषण व मूल्यांकन यांच्या आधारे संसाधनांचा विचारपूर्वक उपयोग करण्याचे तंत्र वापरले जाते.पर्यावरणाचे व्यवस्थापन विशिष्ट प्रदेश किंवा राष्ट्र यांच्याशी मर्यादित नसून ती संपूर्ण जगाची गरज आहे. भविष्यात मानवी समाजाच्या समन्यायक्षम उपयोगासाठी परिसंस्थांचे रक्षण करणे व परिसंस्थांतील अखंडत्व राखणे हे पर्यावरण व्यवस्थापनाचे ध्येय आहे.

पर्यावरण व्यवस्थापनाची आवश्यकता पर्यावरणातील निरनिराळ्या घटकांचे संशोधन करणे. पर्यावरणाच्या नियोजनाची रूपरेषा तयार करणे,पर्यावरणाच्या विविध घटकांना प्रदूषणमुक्त ठेवणे.मानवाला प्रदूषणाच्या परिणामांपासून वाचविणे.अवक्षय होत असलेल्या सजीवांना संरक्षण देणे.पर्यावरणाचा दर्जा राखला जावा म्हणून विशिष्ट नियमावली वा तत्त्वे ठरविणे. प्रदूषण नियंत्रणाद्वारे पर्यावरणाच्या गुणवत्तेचे रक्षण करणे. व्यवस्थापनासाठी उपायांचे समीक्षण करणे व त्यात सुधारणा करणे.व्यवस्थापनासाठी नियोजित केलेल्या उपायांच्या परिणामांची तपासणी करणे.पर्यावरण व्यवस्थापनासाठी साहित्यसंग्रह करणे.पर्यावरण शिक्षण देण्याची व्यवस्था करणे आणि समाजात जाणीव व जागृती निर्माण करणे.संसाधनांचा बहुउद्देशीय वापर करून पारिस्थितिकीय संतुलन राखण्याचा प्रयत्न करणे.जैवविविधतेचे परिरक्षण करणे.स्वच्छ तंत्रज्ञान उत्पादन संकल्पना स्वीकारणे.पर्यावरण संधारणासाठी नियम व कायदे करून त्यांची अंमलबजावणी करणे.पर्यावरण व्यवस्थापनाचे धोरणहे ठरविताना खालील घटकांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते.

पर्यावरण हानी टाळण्यासाठी उपाय

1. हवा प्रदूषण, जलप्रदूषण व भूमिप्रदूषण यांवर प्रभावीपणे नियंत्रण आणणे व कार्यक्षम उपाय योजणे.
2. ऊर्जा संसाधनांसह इतर सर्व संसाधनांचा अतिवापर टाळणे व टाकाऊ पदार्थांची कमीत कमी निर्मिती व्हावी यासाठी कमी खर्चिक परंतु कार्यक्षम तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे.शाश्वत विकासासाठी उत्पादन निर्मितीकरिता स्वच्छ तंत्रज्ञानाचा वापर करणे.
3. शाश्वत विकासासाठी पर्यावरण प्रभाव मूल्यांकन तपासणी, पर्यावरण व्यवस्थापन पद्धती, पर्यावरण जोखीम मूल्यमापन इत्यादी साधनांचा स्वीकार करणे.
4. व्यापक स्तरावर पर्यावरणीय जगजागृती व्हावी यासाठी प्रोत्साहन देणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरण समस्यांची समाजात जागृती निर्माण व्हावी म्हणून विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.
5. शैक्षणिक स्तरावर पर्यावरण शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.
6. लोकसंख्या वाढीस प्रतिबंध व्हावा यासाठी योजना आखणे.
7. सामाजिक समन्याय व्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी प्रयत्न करणे.

पर्यावरणाच्या प्रमुख घटकांचे व्यवस्थापन

पर्यावरण हे जैविक तसेच अजैविक घटकांपासून बनलेले असते. असे व्यवस्थापन अत्यंत गरजेचे आहे. पर्यावरणातील काही प्रमुख घटक पुढीलप्रमाणे आहेत वन व्यवस्थापन,वन्यजीव व्यवस्थापन,मृदा व्यवस्थापन,

Ghodekar
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



225

जल संसाधनांचे व्यवस्थापन,खनिज संसाधनांचे व्यवस्थापन,ऊर्जा संसाधनांचे व्यवस्थापन.

याशिवाय पर्यावरण व्यवस्थापनात प्रदूषण नियंत्रित करण्याला अधिक प्राधान्य दिले जाते. यास प्रदूषण नियंत्रण व्यवस्थापन असेही म्हणतात. यात

(अ) वायुप्रदूषण नियंत्रण उपाय,

(आ) मृदाप्रदूषण नियंत्रण उपाय,

(इ) जलप्रदूषण नियंत्रण उपाय आणि

(ई) अपशिष्ट पदार्थांचे व्यवस्थापन यांचा समावेश होतो.

निष्कर्ष

मानवी प्रगती बरोबरच निसर्गाचा समतोल राखणे काळाची गरज आहे. एका बाजूने मानवी प्रगती घरात गेल्या असता निसर्गाकडे दुर्लक्ष केले तर एक काळ असा येऊ शकेल की,देशात भूकंप,पूर, दुष्काळ व प्रदूषण अशा प्रकारचे भयंकर प्रश्न बनवतील त्यातून मानवी जीवन जगणे अशक्य होईल. त्यामुळे पर्यावरणाच्या सुरक्षा व त्यासाठी पर्यावरण व्यवस्थापन करणे काळाची गरज आहे.

संदर्भसूची

1. रावसाहेब जाधव,2004भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास विषयक समस्या, मीना प्रकाशन, देवगड जिल्हा सिंधुदुर्ग.
2. र.पू.कुरुलकर,1993, भारतीय अर्थव्यवस्था विद्या प्रकाशन, नागपूर.
3. राजू जैन,2004, भारत मे सार्वजनिक उद्योग, युनिव्हर्सिटी पब्लिकेशन, नई दिल्ली.
4. देशपांडे दत्तात्रेय, 2006 विशाल पब्लिकेशन, मुंबई.
5. डि.के. देशपांडे,1990 औद्योगिक अर्थशास्त्र मंगेश प्रकाशन,नागपूर.
6. जी.एन. झामरे,2004,भारतीय अर्थशास्त्र विकास व पर्यावरणात्मक, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

226